## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५१/२०१२/जा.५०६, दिनांक २५/०७/२०१२, ०७/०८/२०१२, २३/०८/२०१२, ०५/०९/२०१२ व १२/०९/२०१२.

३) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे अभिवेदन.

४) मे. श्रीगणेश वेअर हाऊससिंगचे मालक यांचे दिनांक ०१/०८/२०१२ व ०६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदने.

५) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) श्री स्वस्तीक ट्रेडर्स, वाशी एन्टरप्रायजझेस, शुभलाभ एन्टरप्रायजेस, विवेक एन्टरप्रायझेस व सिध्दार्थ ट्रेडर्स यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

७) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५१/२०१२/जा.५८७, दि. २४/०८/२०१२.

८) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २९/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

९) मे. श्रीगणेश वेअर हाऊससिंगचे मालक यांचे दिनांक ०१/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१०) मे. श्रीगणेश वेअर हाऊससिंग, महाजन ट्रेडर्स, ओमकार ट्रेडर्स, मादामल तिलोकचंद, अंबा ट्रेडिंग, ओमप्रकाश सोमनाथ, चंद्रकुमार ओमप्रकाश, रिया एन्टरप्रायजेस, रघुवीर राईस ट्रेडर्स, ओमसोम फुडस् व शाह सप्लायर्स यांचे दिनांक १०/०९/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

११) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक ११/०९/२०१२ रोजी प्राप्त अहवाल

१२) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५१/२०१२/जा. ६५०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १४ /०९/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

0002

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे श्रीगणेश वेअर हाऊस, द्वारा जयंत वेअर हाऊस, प्लॉट क्र. ४८/४९, सेक्टर १९ ए, ए.पी.एम.सी. गेट नं.२ समोर, नवी मुंबई, वाशी, या गोदामात प्रवेश केला. सदर ठिकाणी गोदामात उपस्थित असलेले संतोष कोंडीबा मोरे, श्रीगणेश वेअर हाऊसींगचे मालक यांचेकडे चौकशी केली असता सदरचे गोदाम मे. जयंत ऑईल मीलच्या नावे असून त्यांनी भाडेतत्वावर मागील एक वर्षापासून चालविण्यास घेतले असल्याचे अधिका-यांना पंचासमक्ष सांगीतले. गोदामाच्या पत्त्याचा पुरावा म्हणून विद्युत देयकाची आणि भाडेपावतीची प्रत दाखवीली. अधिकाऱ्यांनी गुमास्ता परवाना, साठा परवाना किंवा अन्य परवान्याबाबत चौकशी केली असता गुमास्ता परवान्याशीवाय इतर कोणताही परवाना नसल्याचे त्यांनी पंचासमक्ष सांगीतले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गोदामातील साठा नोंदवहीनुसार प्रत्यक्षात साठा नोंद संतोष कोंडीबा मोरे यांनी दाखविल्यानुसार पहाणी केली असता ती खालील प्रमाणे आढळली.

| अ. क्र. | अन्नधान्य / कडधान्याचा तपशील | बाचके | साठा (किलोमध्ये) | दर प्रती किलो | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ७०८१ | १९६५४० | ४०/- | ७८,६१,६००/- |
| २ | गहू | २०१७ | ५९२४० | २५/- | १४,८१,०००/- |
| ३ | तूरडाळ | ४७३ | १४१९० | ३५/- | ४,९६,६५०/- |
| ४ | बाजरी | ५२२ | १५६६० | १८/- | २,८१,८८०/- |
| ५ | ज्वारी | १३३१ | ६६५५० | २२/- | १४,६४,१००/- |
| ६ | मका | ४२२ | २५३२० | १२/- | ३,०३,८४०/- |
| ७ | जव | २०० | १०००० | ८/- | ८०,०००/- |
| | एकूण | १२०४६ | ३८७५०० | | १,१९,६९,०७०/- |

वरील प्रमाणे पंचासमक्ष मोजदाद करण्यात आलेल्या विवीध धान्य कडधान्याचा साठा हा मोठ्या प्रमाणावर साठवणूक केल्याचे उपस्थित संतोष कोंडीबा मोरे यांचे निदर्शनास अधिकाऱ्यांनी आणून दिला व सदर जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याची खरेदी वीक्री साठवणूकीकरीता आवश्यक असलेल्या महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ अन्वये घाऊक परवाना सादर करण्यास सुचीत केले असता सदरचा घाऊक परवाना त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगून त्याकरीता संबंधीत प्राधिकरणाकडे अर्ज केला नसल्याचे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगीतले. तद्नंतर संतोष कोंडीबा मोरे यांनी सदर धान्य कडधान्याचा साठा हा सुमारे २०, २५, ३०, ४०, ५० व ६० किलो वजनाच्या एकूण १२०४६ बाचक्यांमध्ये असल्याचे सांगीतले आणि सदरचा साठा (१) महाजन ट्रेडर्स, (२) ओंमकार ट्रेडर्स, (३) मादामल तिलोकचंद, (४) अंबा ट्रेडर्स, (५) ओमप्रकाश सोमनाथ,

(६) वाशी एन्टरप्रायजेस, (७) शुभलाभ एन्टरप्रायजेस, (८) चंद्रकुमार ओमप्रकाश, (९) स्वस्तीक ट्रेडर्स, (१०) रियल एन्टरप्रायजेस या घाऊक व्यापाऱ्यांच्या मालकीचा असल्याचे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगीतले. सदरचा साठा नमुद घाऊक व्यापाऱ्यांचा असल्याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे म्हणजेच साठा मालकाची खरेदीबीले, घाऊक अनुज्ञप्ती तसेच अनुज्ञप्तीतील तरतुदीनुसार इतर ठिकाणी साठवणूकीकरीता परवानगी इत्यादी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या सुचना दिल्या असता सदरचे पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे उपस्थित संतोष कोंडीबा मोरे याने अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगीतले.

सदरचे धान्य/कडधान्य हे अनधिकृतपणे साठवणूक केल्याचे निदर्शनास आल्यानुसार उपरोक्त एकूण अदाजे किमत रुपये एक कोटी एकोणीस लाख एकोणसत्तर हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष अधिकाऱ्यांनी जागीच जप्त करुन गोदामाच्या मुख्य शटरला टाळे लावून सही शिक्क्यानीशी सीलबंद करण्यात आले.

अशाप्रकारे मे.श्रीगणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी विनापरवाना वर नमुद धान्य व कडधान्य या जीवनावश्यक वस्तूची साठेबाजी केल्याचे तपासणीमध्ये निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्याची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबधिताविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६२/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर करुन पुढील तपास सुरु असल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. तसेच सदर सुनावणीस श्रीगणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन पुढील २ दिवसात सादर करणार असल्याचे सांगुन सदर गोदाम अनधिकृत असल्याचे मान्य करुन कोणत्याही प्रकारचा

परवाना नसल्याचे सांगितले. सदरचा जप्त साठा हा त्यांच्या मालकीचा नसुन घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार इतर व्यापाऱ्यांचा असल्याने सदर व्यापाऱ्यांकडे घाऊक परवाना आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्यासाठी संबधित साठा मालकास पाचारण करण्यात यावे. साठवणुकीच्या अनुषंगाने विविध आस्थापनांसोबत साठवणूकीकरिता करारनामा नसल्याचे सांगितले. जप्त साठ्याबाबत त्यांना अधिक विचारणा केली असता ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालक याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, श्रीगणेश वेअर हाऊसचे मालक तसेच नमूद गोदामातील जप्त साठ्याचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २१/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्री गणेश वेअर हाऊस यांचे वतीने वकालतनामासह ॲड. श्री. सतीश तिवारी व मे. श्री गणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगून सदर प्रकरणी घटनास्थळी नोंदविण्यात आलेला पंचनामा व इतर दस्तऐवजाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावयाच्या असल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, श्री गणेश वेअर हाऊसचे मालक यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजी मे. श्री गणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी या कार्यालयास ठेवण्यात आलेल्या सुनावणीच्यावेळी, सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला परंतु अनुसुचित वस्तु नसलेला साठा त्यांच्या साठा मालकास परत करण्याची विनंती केली तसेच उर्वरीत साठ्याची धुरीकरण (fumigation) करण्याची परवानगी मागितली आहे. सबब, त्यांनी केलेल्या विनंतीनुसार नमूद वेअरहाऊसमधील अनुसुचित वस्तूंव्यतिरिक्त जप्त असलेला गव्हाचा ५९२.४० क्विंटल, ज्वारीचा ६६५.५० क्विंटल, बाजरी १५६.६० क्विंटल, मका २५३.२० क्विंटल व जव १०० क्विंटल साठा हा खराब होऊ नये म्हणून त्यांच्या साठा मालकास तात्काळ परत करण्याचे आदेश देण्याबाबत तसेच उर्वरीत जप्त करण्यात आलेला विविध अन्नधान्य/कडधान्यांचा साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याच्या सुचना देण्याबाबत तसेच उर्वरीत साठ्याची धुरीकरण (fumigation) ची परवानगी देऊन सदर साठ्याची धुरीकरण (fumigation) झाल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी जतन करुन ठेवण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ७ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

तद्नंतर दिनांक ०१/०९/२०१२ रोजी मे. श्री गणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी कार्यालयात उपस्थित राहून समक्ष सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये, दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीमध्ये त्यांच्या वकीलाने काही कागदपत्रांची मागणी करुन सुनावणी पुढे ढकलण्याच्या केलेल्या विनंतीनुसार त्यांच्या संमतीने पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आल्याचे सांगून त्यांच्या वकीलाचा वकालतनामा

रद्द करुन त्यांच्या गोदामातील व्यापाऱ्याचा धान्य खराब होण्याची शक्यता असल्याने त्यांनी त्यांची व त्यांच्या व्यापाऱ्याची सुनावणी लवकरात लवकर घेण्यात यावी, अशी विनंती करुन वकीलाने त्यांचा वकालतनामा परत घेतले असल्याबाबत सांगून वाचावे क्र. ९ अन्वये निवेदन सादर केले.

सबब, जप्त साठा मालकाचा अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नाशवंत असल्याने, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०९/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी रद्द करुन पुढील सुनावणी दिनांक १०/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्रीगणेश वेअर हाऊसिंगचे मालक संतोष कोंडिबा मोरे यांनी उपस्थित राहून यापूर्वीच टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस महाजन ट्रेडर्सचे मालक राकेश डिसुलाल जैन, ओमकार ट्रेडर्सचे मालक मुकेश शिवनदास मोहनानी, मादामल तिलोकचंदचे मालक इशकुमार मदनलाल गर्ग, अंब्रा ट्रेडिंगचे भागीदार भावेश मानिकजी दंड, ओमप्रकाश सोमनाथचे कर्ता (huf) चंद्रकुमार ओमप्रकाश, चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश मुरगई, रिया एन्टरप्रायजेसचे मालक हरेश जयंतीलाल चांद्रा, रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल, ओमसोम फुडस्‌चे मालक मोहित चंदर मुरगई व शाह सप्लायर्सचे मालक विजय मोहनलाल शाह यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. १० अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच मे. बॉम्बे सप्लायर्स व मे. शांतीनाथ ट्रेडिंग कंपनीचे मालक अथवा त्यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २६/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली आहे.

सदर प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नाशवंत आहे. जप्त साठयास किड लागु नये अथवा खराब होवु नये म्हणुन यापूर्वी धुरीकरण ची परवानगी देण्यात आली आहे. दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस सर्व साठा मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करण्यात आले. तथापी, सदर सुनावणीस मे. बॉम्बे सप्लायर्स व मे. शांतीनाथ ट्रेडिंग कंपनीचे मालक यांचे वतीने मालक म्हणुन अनुज्ञप्तीधारक अनुपस्थित राहीले. या करीता दिनांक २६/०९/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. तत्पुर्वी उर्वरीत साठा मालकांनी सुनावणीस उपस्थित राहुन त्यांचे लेखी निवेदने सादर केले असल्याने सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

## युक्तिवाद :-

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, एकदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी याचे श्री गणेश वेअर हाऊस मध्ये नमूद असलेला १,१९,६९,०७०/- रुपये किंमतीचा अन्नधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक सयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत आहे. यातील अटक आरोपी यांचेकडे केले तपासात त्याचेकडे शिधावाटप आस्थापनेचा घाउक सयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नाही तसेच तो त्याने मिळणेकरता शिधावाटप आस्थापनेकडे अर्ज देखील केलेला नाही. यातील अटक आरोपी याने त्याचे वेअर हाऊसमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा कोणाकोणाकडून भाडेतत्त्वावर ठेवण्यास घेतला आहे. त्याचेकडे इतर कोणते परवाने आहेत. याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. अटक आरोपी याने सदर गुन्ह्याचे तपासकामी कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नसून गुन्ह्याचा तपास चालू आहे. त्याकरता सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्याचा साठा आरोपीला सध्या परत न करता गुन्ह्याचा तपास चालू असून यातील नमूद १० व्यापाऱ्याकडे मालाबाबत विचारपुस करुन जबाब नोंदविणे बाकी आहेत. त्याकरता सदर गुन्ह्यात त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी त्याना १५ दिवस मुदत वाढवून मिळणेस विनती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. श्री गणेश वेअरहाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी उपस्थित राहुन युक्तीवाद केला की, सदर गोदाम अनधिकृत असल्याचे मान्य करुन कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे सांगितले. सदरचा साठा त्याच्या मालकीचा नसुन घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार इतर व्यापाऱ्यांचा आहे. याबाबत लेखी निवेदन २ दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले.

दिनांक ०६/०८/२०१२ रोजी मे. श्री गणेश वेअरहाऊसीगचे मालक संतोष कोंडीबा मोरे याचे टपालामार्फत प्राप्त निवेदनामध्ये ते मे. श्री गणेश वेअरहाऊसचे मालक असुन त्यांनी सदर गोदाम मे. गोकुल मनी रियल इस्टेट प्रा. लि. याचेकडून भाडे करारपत्रानुसार २२ महिन्यासाठी दिनांक २३/०८/२०१३ पर्यंत भाडेतत्वावर घेतलेले आहे. दिनांक २१/०७/२०१२ रोजीच्या तपासणीवेळी त्यांचे वैयक्तिक कारणामुळे ते साठयाबाबत पुरावादर्शक कागदपत्रे दाखवु शकले नाहीत. ते वेअरहाऊस किपर असुन त्यांच्या वेअरहाऊसमध्ये त्यांनी १७ व्यापाऱ्याचा साठा साठवणुक केलेला असुन त्यापैकी ५ व्यापारी विवेक एन्टरप्रायझेस यांचा ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ६२ बाचक्यामधील ३१ क्विंटल ज्वारीचा साठा, सिध्दार्थ ट्रेडर्स यांचा ५० कि.ग्रॅ.क्षमतेच्या २०० बाचक्यांमधील १०० क्विंटल जवाचा साठा, शुभलाभ एन्टरप्रायझेस यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या २०२० बाचक्यांमधील ६०६ क्विंटल गव्हाचा साठा, वाशी एन्टरप्रायझेस यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेच्या २५४ बाचक्यांमधील व ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १५१ बाचक्यामधील एकूण

१०८.८० क्विंटल गव्हाचा साठा आणि स्वस्तिक ट्रेडर्स यांचा ६० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ६२२ बाचक्यांमधील ३७३.२० क्विंटल मकाचा साठा, ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ३२०५ बाचक्यांमधील तसेच ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या २३८ बाचक्यांमधील एकूण १६७३.९० क्विंटल ज्वारीचा साठा, ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ५४९ बाचक्यांमधील व २५ कि.ग्रॅ. क्षमतेच्या २४० बाचक्यांमधील एकूण २८४.७० क्विंटल बाजरीचा साठा, ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १३३ बाचक्यांमधील ६६.५० क्विंटल जवाचा या अनुसुचित वस्तु नसलेला साठा साठवणुक केलेला असुन सदर साठा मुक्त करुन त्यांचे ताब्यात देण्याची विनंती केली व उर्वरीत १२ व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तूंच्या परिमाणासहित तपशिल सादर केल्याचे सांगून त्याअनुषगाने विल्हेवाटीचे आदेश होण्यास विनंती केली. त्यानुसार महाजन ट्रेडर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे १८६८ बाचक्यांमधील एकूण ४६७.०० क्विंटल तांदळाचा साठा, ओमकार ट्रेडर्स यांचा यांचा २० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १४५९ बाचक्यांमधील, २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ७७२ बाचक्यांमधील व ४० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ५१२ बाचक्यांमधील एकूण ६८९.६० क्विंटल तांदळाचा साठा, मादामल तिलोकचंद यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या २५१ बाचक्यांमधील व २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ६२८ बाचक्यांमधील एकूण २३२.३० क्विंटल तांदळाचा साठा, अंबा ट्रेडर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ३८४ बाचक्यांमधील एकूण ९६.०० क्विंटल तांदळाचा साठा, ओमप्रकाश सोमनाथ यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ६३२ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७४ बाचक्यांमधील एकूण २४५.०० क्विंटल तांदळाचा साठा, चंदरकुमार ओमप्रकाश यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ८ बाचक्यांमधील, ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७१२ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७ बाचक्यांमधील एकूण ५२४.१० क्विंटल तांदळाचा साठा, रिया एन्टरप्रायजेस यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ४७३ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ११० बाचक्यांमधील एकूण १९६.९० क्विंटल तुरडाळचा साठा, रघुवीर राईस ट्रेडर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ९८८ बाचक्यांमधील एकूण २४७.०० क्विंटल तांदळाचा साठा, ओमसोम फुडस् यांचा ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ३४८ बाचक्यांमधील एकूण १७४.०० क्विंटल तांदळाचा साठा, शाह सप्लायर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ८०० बाचक्यांमधील एकूण २००.०० क्विंटल तांदळाचा साठा, मे. बॉम्बे सप्लायर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ७५४ बाचक्यांमधील एकूण १८८.५० क्विंटल तांदळाचा साठा तसेच मे. शांतीनाथ ट्रेडर्स यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ७ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ६ बाचक्यांमधील एकूण ५.१० क्विंटल मुगडाळचा साठा प्रत्यक्षात नमूद गोदामात साठवणूक असल्याचे सांगून घटनास्थळी साठवणूकीबाबतचे परिपूर्ण तपशिलाचे दस्तऐवज उपलब्ध नसल्याने साठवणूकीचा साठा कमी दर्शविल्याचे मान्य करुन सद्य:स्थितीत वरील नमूद अन्नधान्य/कडधान्याचा साठा जप्त असल्याचे गृहित धरण्यात यावे व सदर साठा खराब होवु नये म्हणुन धुरीकरण (Fumigation) करण्याची परवानगी देण्यात यावी. तसेच जप्त असलेला साठा लवकरात लवकर मुक्त करुन त्यांचे गोदाम सिलमुक्त करुन देण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अटक आरोपी याचे श्री गणेश वेअरहाऊस मध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्यांचा साठा हा विविध व्यापाऱ्याचा असून त्यानी त्याचे मालाच्या खरेदी पावत्या तसेच त्यांचेकडे शिधावाटप आस्थापनेचा घाऊक सयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) व इतर परवाने असुन त्यांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत. श्री. हरेष खिमजी मोमाया (शांतीलाल ट्रेडिंग कंपनी) व श्री. ईश मदनलाल गर्ग (मादामद तिलोकचंद) यांचेकडील शिधावाटप आस्थापनेचा घाऊक सयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) वर त्यांचे इतर गोदामाची नावे असल्याची नोंद असून सदर नोंदीत श्री गणेश वेअरहाऊस C/O जयंत वेअरहाऊसची नोंद नाही. तसेच इतर व्यापारी व श्री गणेश वेअरहाऊस C/O जयंत वेअरहाऊसचे मालक याच्यामध्ये त्यांचा माल साठवणूक करुन ठेवलेबाबतचे करारनामे झालेले नाहीत. यातील अटक आरोपी संतोष कोंडीबा मोरे व हा चालवित असलेले श्री गणेश वेअरहाऊस C/O जयंत वेअरहाऊस हे त्याने भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतले असून त्याबाबत त्याने सदर वेअरहाऊसचे मालकाशी कोणत्याही प्रकारचा करारनामा केलेला नाही. तसेच त्यांना वेअरहाऊसची मालकाची माहिती न देता तपासकामी सहकार्य केलेले नाही. वेअर हाऊस मालकाचा तपास चालू आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्याचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाऊक सयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्रीगणेश वेअर हाऊस यांचे वतीने वकालतनामासह ॲड. श्री. सतीश तिवारी व मे. श्रीगणेश वेअर हाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगून सदर प्रकरणी घटनास्थळी नोंदविण्यात आलेला पंचनामा व इतर दस्तऐवजाच्या छायाकित प्रती उपलब्ध करुन घ्यावयाच्या असल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. महाजन ट्रेडर्सचे मालक राकेश डिसुलाल जैन यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी तांदळाचा साठा हा नमुद गोदामात साठवणुक केल्याचे सांगुन पुराव्यादाखल खरेदी बिलांच्या व घाऊक परवानाच्या छायांकित प्रती सादर केल्या असल्याने त्यांचा जप्त असलेला तांदळाचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ओमकार ट्रेडर्सचे मालक मुकेश शिवनदास मोहनानी यांनी युक्तीवाद केला की, ते मागील दिड वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन

त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ७८९ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, सयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनाम्याच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यानी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मादामल तिलोकचंदचे मालक इशकुमार मादामल गर्ग यानी युक्तीवाद केला की, ते मागील २० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला सयुक्त घाऊक परवाना क्रमांक ३९१ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, सयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनामा तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यानी कागदपत्राची पुर्तता केली असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अंबा ट्रेडिंगचे भागिदार भावेश मानेकजी दंड यानी युक्तीवाद केला की, ते मागील दीड वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्याचेकडे दिनाक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला सयुक्त घाऊक परवाना क्रमाक ८१९ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनामा तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्राची पुर्तता केली असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ओमप्रकाश सोमनाथचे कर्ता (huf) चंद्रकुमार ओमप्रकाश यांनी युक्तीवाद केला की, नमूद गोदामात त्यांचा तांदळाचा साठा जप्त करण्यात आला असून साठ्याच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, लॉरी बिल्टी, गोदामाचे गेटपास, सयुक्त घाऊक परवाना तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती सादर केले असुन त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश यांनी युक्तीवाद केला की, नमूद गोदामात त्यांचा तांदळाचा साठा जप्त करण्यात आला असून साठ्याच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, लॉरी बिल्टी, गोदामाचे गेटपास, संयुक्त घाऊक परवाना तसेच अतिरीक्त

गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर केले असुन त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. रिया एन्टरप्रायजेसचे मालक हरेश जयतीलाल चांद्रा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ८ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ६६ आहे. सदर साठा त्यांनी त्याच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनामा तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्राची पुर्तता केली असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ५ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला सयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५३६ आहे. सदर गोदामात त्याचा ९८८ बाचक्यामधील तांदळाचा साठा त्याच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनामा या सर्व दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्राची पुर्तता केली असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ओम सोम फुडस्चे मालक मोहित चंदर मुरगई यांनी युक्तीवाद केला की, नमूद गोदामात त्यांचा तांदळाचा साठा जप्त करण्यात आला असून साठ्याच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, लॉरी बिल्टी, गोदामाचे गेटपास, संयुक्त घाऊक परवाना तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती सादर केले असुन त्याचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शाह सप्लायर्सचे मालक विजय मोहनलाल शाह यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ४ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४१८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस येथे साठवणुक केला असून त्याचा पुरवठा ते हॉटेलवाल्यांना करीत असल्याचे सांगितले. काही वेळेस समान पताचे धान्य उपलब्ध होत नसल्याने ते ग्राहकांना चांगल्या प्रतिचे धान्य पुरवठा करण्यासाठी नमूद गोदामात धान्य साठवणूक केला असून त्यांचा याबाबत काळे

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे". असे स्पष्ट नमुद केले आहे.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी यांचे टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अटक आरोपी यांचे कामधेनू वेअरहाऊसमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) व इतर परवाने नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमूद धान्याच्या साठ्याबाबित योग्य तो आदेश होणेस विनंती असल्याचे सांगितले.

मे. मादामल तिलोकचंद, मे. अंबा ट्रेडिंग, मे. ओमप्रकाश सोमनाथ, मे. चंदरकुमार ओमप्रकाश व मे. ओम सोम फुड या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा तसेच मे. रिया एंटरप्रायजेसचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा तुरडाळचा साठा

बाजारीचा उद्देश नसल्याचे सांगून प्रचलित पध्दतीनुसार त्यांनी सोपस्कर पूर्ण करण्याचे विसरुन गेल्याचे सांगून यापुढे अनुज्ञप्तीमधील अटींनुसार सर्व पूर्तता करण्याची हमी देऊन त्यांचा सदरचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, गोदामाचे गेटपास, करारनामा इत्यादी दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. श्रीगणेश वेअर हाऊस, द्वारा- जयंत वेअर हाऊस, प्लॉट क्र. ४८ व ४९, सेक्टर १९.अे, गेट नं. २ समोर, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६२/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

CONTROLLER OF RATIONING

जप्त असल्याचे सांगुन सदरचा साठा त्यांनी मे. श्री गणेश वेअरहाऊस या गोदामांत साठवणुक केले असल्याचे 813
सांगितले. निवेदनासोबत उपरोक्त साठामालकांनी विविध परवाने, जप्त साठ्याची खरेदी बिले, नमुद गोदामात साठवणुक केल्याबाबत अथवा कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता केलेला अर्ज व इतर दस्ताऐवजांच्या सादर केलेल्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता सर्व आस्थापनांकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता संयुक्त घाऊक परवाना आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने इतर उर्वरीत साठामालकांनी त्यांच्या परवान्यावर मे. श्री गणेश वेअरहाऊस या अतिरीक्त गोदामाची नोंद करण्यासाठी अथवा सदर वेअरहाऊसवर त्यांचा साठा ठेवले असल्याबाबत त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात सुचनापत्र सादर केल्याचे छायांकित प्रतींवरुन दिसुन येते. सदर सुचनापत्र/अर्जाबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारक निहाय परीपूर्ण अहवालात नमुद केले आहे. उपरोक्त साठा मालकांनी त्यांच्या परवान्यावरील पत्यावर पुरेशा जागे अभावी त्यांनी त्यांच्या मालकीचा खरेदी केलेला परवानावरील साठा त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मे. श्री गणेश वेअरहाऊस यांच्या गोदामात साठवणुक केला असल्याचे नमुद केले आहे. सबब, नमूद आस्थापनांच्या मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटी/शर्तींचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला तांदुळ/तुरडाळचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने मे. मादामल तिलोकचंद, मे. अंबा ट्रेडिंग, मे. ओमप्रकाश सोमनाथ, मे. चंदरकुमार ओमप्रकाश व मे. ओम सोम फुड या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा तसेच मे. रिया एंटरप्रायजेस या साठामालकाचा जप्त करण्यात आलेला तुरडाळचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. महाजन ट्रेडर्स, मे. ओमकार ट्रेडर्स, मे. रघुवीर ट्रेडर्स व मे. शाह सप्लायर्सचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. श्री गणेश वेअरहाऊस या गोदामात साठवणुक केल्याचे सांगितले. निवेदनासोबत नमुद साठामालकांनी सादर केलेल्या विविध परवाने तसेच साठ्याच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांनी अन्नधान्य/कडधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन सदर परवान्यांवर वेगळया गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येत असल्याने नमुद परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम

कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, वरील आस्थापनांच्या मालकांपैकी मे. महाजन ट्रेडर्स यांनी दिनांक २४/०७/२०१२ रोजी म्हणजेच या कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या जप्तीच्या कारवाई नंतर त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्तीप्राधिकारी यांच्या कार्यालयात मे. श्री गणेश वेअरहाऊस या गोदामात त्यांचा तांदळाचा साठा ठेवल्याबाबतचे सुचनापत्र सादर करुन केवळ सोपस्कार पुर्ण करुन त्यांनी या कार्यालयाचे जाणीवपूर्वक दिशाभुल करण्याचे प्रयत्न केले तसेच उर्वरीत साठामालकांनी त्यांचा साठा नमूद गोदामात साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्रही सादर न केल्याचे दिसुन येते. सदर प्रकरणी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालात, सदर साठा मालकांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत अथवा तपासणी नंतर सादर केल्याने याप्रकरणी नमुद साठामालकाचे अर्ज ग्राहय धरता येणार नाही असे नमुद केले आहे.

सबब, मे. महाजन ट्रेडर्स, मे. ओमकार ट्रेडर्स, मे. रघुवीर ट्रेडर्स व मे. शाह सप्लायर्स या चारही साठा मालकांनी साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणुक करुन स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करुन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सिध्द झाले आहे. सदर परवाना धारकांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र सादर केले नाही अथवा परवान्यावर गोदामाची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तरतुदींचा व सदर आदेशान्वये त्यांना देण्यात आलेल्या परवानामधील अटी/शर्तींचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने मे. महाजन ट्रेडर्स, मे. ओमकार ट्रेडर्स, मे. रघुवीर ट्रेडर्स व मे. शाह सप्लायर्स या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. श्री गणेश वेअरहाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी सदर गोदाम मे. गोकुल मनी रियल इस्टेट प्रा. लि. यांचेकडून भाडे करारपत्रानुसार २२ महिन्यांसाठी दिनांक २३/०८/२०१३ पर्यंत भाडेतत्वावर घेतले असल्याचे सांगुन दिनांक २१/०७/२०१२ रोजीच्या तपासणीवेळी त्यांचे वैयक्तिक कारणांमुळे ते साठयाबाबत पुरावादर्शक कागदपत्रे दाखवु शकले नाहीत. ते वेअरहाऊस किपर असुन त्यांच्या वेअरहाऊसमध्ये त्यांनी १७ व्यापाऱ्यांचा साठा साठवणुक केलेला असुन त्यापैकी ५ व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तु नसलेला साठा साठवणुक केलेला असुन सदर साठा मुक्त करुन त्यांचे ताब्यात देण्याची विनंती केली व उर्वरीत १२ व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तूंच्या परिमाणासहित तपशिल सादर केल्याचे सांगून त्याअनुषंगाने विल्हेवाटीचे आदेश होण्यास विनंती केली. सदरहु व्यापाऱ्यांचा साठा प्रत्यक्षात नमूद गोदामात साठवणूक असल्याचे सांगून घटनास्थळी साठवणूकीबाबतचे परिपूर्ण तपशिलाचे दस्तऐवज उपलब्ध नसल्याने साठवणूकीचा साठा कमी दर्शविल्याचे मान्य करुन सद्य:स्थितीत नमूद अन्नधान्य/कडधान्याचा साठा जप्त असल्याचे



CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MU
001

गृहित धरण्यात येवुन जप्त असलेला साठा लवकरात लवकर मुक्त करुन त्यांचे गोदाम सिलमुक्त करण्याची विनंती केली. तथापी, तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, श्री गणेश वेअरहाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी श्री गणेश वेअरहाऊस c/o जयंत वेअरहाऊस हे भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतले असून त्याबाबत त्याने सदर वेअरहाऊसचे मालकाशी कोणत्याही प्रकारचा करारनामा केलेला नाही. तसेच त्यांना वेअरहाऊसची मालकाची माहिती न देता तपासकामी सहकार्य केलेले नाही. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याचे सांगितले. यावरुन श्री गणेश वेअरहाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभुल करणारे आहे. श्री गणेश वेअरहाऊसचे मालक संतोष कोंडीबा मोरे यांनी त्यांच्या वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तुंचा साठा हा साठवणुक करुन घेतांना सदरहु साठा मालकांनी त्यांच्या घाऊक परवान्यावर श्री गणेश वेअरहाऊस या अतिरिक्त गोदामाची नोंद केली आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे तसेच त्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे घेणे आवश्यक होते. तथापी, श्री गणेश वेअरहाऊसचे मालक यांनी याबाबत संबंधित परवाना धारकांकडून सदर बाबत पूर्तता करुन न घेता अथवा संबंधित परवानाधारकास पुर्तता करुन घेण्यास आवश्यक करारनामा इ. कागदपत्रे उपलब्ध करुन न देता त्यांनी त्यांच्या गोदामात अवैध साठवणुक व साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेल्या साठामालकास गैरमार्गाने मदत करुन त्यांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६२/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मादामल तिलोकचंद यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या २५१ बाचक्यांमधील व २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ६२८ बाचक्यांमधील एकूण २३२.३० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अंबा ट्रेडिंग यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ३८४ बाचक्यांमधील एकूण ९६.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ओमप्रकाश सोमनाथ यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ६३२ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७४ बाचक्यांमधील एकूण २४५.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. चंदरकुमार ओमप्रकाश यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ८ बाचक्यांमधील, ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७१२ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १७ बाचक्यांमधील एकूण ५२४.१० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ओमसोम फुडस् यांचा ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ३४८ बाचक्यांमधील एकूण १७४.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. रिया एन्टरप्रायजेस यांचा ३० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ४७३ बाचक्यांमधील व ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ११० बाचक्यांमधील एकूण १९६.९० क्विंटल तुरडाळचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. महाजन ट्रेडर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे १८६८ बाचक्यांमधील एकूण ४६७.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ओंमकार ट्रेडर्स यांचा यांचा २० कि.ग्रॅ. क्षमतेच्या १४५९ बाचक्यांमधील, २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ७७२ बाचक्यांमधील व ४० कि.ग्रॅ. क्षमतेच्या ५१२ बाचक्यांमधील एकूण ६८९.६० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. रघुवीर राईस ट्रेडर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ९८८ बाचक्यांमधील एकूण २४७.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. शाह सप्लायर्स यांचा २५ कि.ग्रॅ. क्षमतेचे ८०० बाचक्यांमधील एकूण २००.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

११) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदळाचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्रीगणेश वेअर हाऊसचे मालक सतोष कोंडीबा मोरे
२) मे. महाजन ट्रेडर्सचे मालक
३) मे. ओमकार ट्रेडर्सचे मालक
४) मे. मादामल तिलोकचदचे मालक
५) मे. अबा ट्रेडिंगचे मालक
६) मे. ओमप्रकाश सोमनाथचे मालक
७) मे. चदरकुमार ओमप्रकाशचे मालक
८) मे. रिया एन्टरप्रायजेसचे मालक
९) मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक
१०) मे. ओमसोम फुडसचे मालक
११) मे. शहा सप्लायर्सचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई याचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई याना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबधीतावर बजावून त्याची दिनाकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमडळ, ठाणे याना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई याना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई याना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.